# नेतृत्व आणि समाजात विकसित होत असलेली महिलांची भूमिका

नेतृत्व हे व्यवस्थापनाच्या अनेक तत्त्वांपैकी एक महत्त्वाचे तत्त्व आहे. कोणत्याही कार्याच्या अंमलबजावणीसाठी,एका नियोजित ध्येयपूर्तीकडे जाण्यासाठी, आणि कार्याचे नियंत्रण व मार्गदर्शन करण्यासाठी योग्य नेतृत्वाची गरज असते. समाजाची जडण-घडण होत असताना काही उणीवा राहून जातात, त्या विशेष प्रयत्न करून घालवाव्या लागतात. कृषक समाज-व्यवस्थेपासून महिलांचा सहभाग, त्यांचे समाजातील स्थान या गोष्टी अवघड होत गेल्या. महिलांना दुय्यम वागणूक मिळत गेली. आणि त्यातूनच विषमतेचे प्रश्न निर्माण झाले. गेली अनेक वर्ष स्त्री प्रामुख्याने फक्तं घर दार बघणारी, आल्यागेल्यांचं बघणारी अशी होती. अर्थातच त्याला अपवाद हे होतेच परंतु कमी प्रमाणात. पण, गेल्या २० ते २५ वर्षांत स्त्रिया, मोठ्या संख्येने सामाजिक, आर्थिक विश्वांमध्ये स्वतःच वेगळं अस्तित्व सिद्ध करू लागल्या आहेत. अनेकदा या प्रगतीच्या आड स्त्रीला समाजात पूर्वी दिला जाणारा दुय्यम दर्जा आड येतो. ती कायद्याने,आर्थिकदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या जरी सक्षम झाली असली, तरी समाज म्हणून अजून हे बदल पचवायची प्रगल्भता यायची आहे. सध्याची स्त्रियांची परिस्थिती, म्हणजे बदलाच्या वाटेवरचे काही खाचखळगे अशी आहे.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात नव्या भारताचा संकल्प आपल्यासमोर आहे. परंतु ज्यावेळी सर्व शक्यता सर्वांसाठी समान रूपात खुल्या असतील त्यावेळीच सर्वांच्या विकासाचे उद्दिष्ट साध्य होऊ शकेल. पूर्वी व्यवसायाबद्दल बोलले की लगेच मोठ्या कॉर्पोरेट्सबद्दल बोलत आहेत, पुरुषांच्या कामाबद्दल बोलत आहेत असा त्याचा अर्थ घेतला जात असे.परंतु प्रत्यक्षात भारताचे बलस्थान हे आपले छोटे स्थानिक उद्योग आहेत. या उद्योगांमध्ये पुरुषांच्या बरोबरीने महिलांचीही भूमिका आहे. उदाहरणा दाखल घ्यायचे झाल्यास, कुंभारकाम, शेती आणि दुग्धजन्य पदार्थ ई. अनेक उद्योग आहेत ज्यांचा आधार महिला शक्ती आणि महिलांचे कौशल्य आहे. मात्र दुर्दैव असे की या उद्योगांची ताकद अजूनही ओळखायची राहून गेली आहे. जुने विचार असलेल्यांनी स्त्रियांचे अशा कामात असलेल्या कौशल्यास हे घरगुती काम मानले होते. भारतातील बहुसंख्य स्त्रिया घरकामात गुंतलेल्या असतात. कमी उत्पादकतेची व कमी कौशल्याची कामे स्त्रियांकडे दिली जातात, म्हणून स्त्रियांना आर्थिक क्षेत्रात दुय्यम स्थान दिले जाते. यामुळे महिलांचे आर्थिकदृष्ट्या सबलीकरण होण्याचे प्रमाण व वेग कमी आहे. महिला उपजीविकेसाठी घर सांभाळून शेती, मजुरी, उद्योग, दुग्ध व्यवसाय, इ. क्षेत्रांत काम करत असतात, परंतु त्या कामाचे कधीच मोजमाप केले जात नाही. त्यामुळे स्त्रियांच्या आर्थिक सबलीकरणाला चालना मिळत नाही.

विसाव्या शतकापर्यंत तर स्त्रियांना मतदानाचा हक्कच नाकारलेला होता. 'मत' या शब्दाचा अर्थ दोन प्रकारे घेता येतो. पहिला प्रचलित राजकीय अर्थ 'मतदान' (vote) देणे. आणि दुसरा अर्थ 'वैचारिक मत' (opinion) देणे. खरे तर हा दुसरा अर्थच दखलपात्र मानवी अर्थ असून पहिला अर्थ हा स्थूल लोकशाहीच्या संदर्भात दिला गेलेला सोयीस्कर कृत्रिम असा राजकीय आविष्कार आहे. कोणत्याही बाबतीत स्त्रीने आपले मत/ विचार व्यक्त करू नयेत, हे बंधनच तिच्या वैचारिक आणि राजकीय भूमिकेचे खच्चीकरण करते व आजही काही प्रमाणात हे चालू आहे. याच्या परिणामी अस्सल मतदानाची प्रक्रिया स्त्रीला कधी उमगलीच नाही. विसाव्या शतकात मात्र मत देणे म्हणजे नक्की काय याची जाणीव होण्यासाठी सुरुवात झाली. नवरा,जावई निवडण्याचे स्वातंत्र्य समाजाने स्त्रीला नाकारले होते, तिला 'सरकार' निवडण्याचे स्वातंत्र्य पुरुषी व्यवस्थेने कधीच दिले नव्हते. तिला फक्त आई, बायको, मुलगी आणि सून होण्याची सक्ती होती. स्त्रीने फक्त चूल आणि मूल इतकच बघावं तितक्या पुरतेच तिचे विश्व मर्यादित हवं हे जणू तिला रक्तातच भिनवलं गेलं होतं. त्याविरुद्धच स्त्रियांनी दिलेला लढा हा भयंकर अवघड असा आहे.

काही प्रमाणात स्त्रियांचा लढा हा पुरुषप्रधान सत्ते बरोबर होता आणि काही प्रमाणात स्त्रियांच्या विरुद्ध देखील. स्त्रिया शोषित होत्या, काही प्रमाणात अजूनही शोषित आहेत, काही स्त्रिया शोषणात सहभागी तरी आहेत किंवा थेट शोषकच आहेत हा. शोषित स्त्री कुणास म्हणावे? तर आर्थिक, शैक्षणिक, वैचारिक इत्यादी मागासलेल्या स्त्रिया म्हणजे शोषित स्त्री. त्यात सर्वधर्मीय, सर्ववर्णीय आणि सर्वजातीय कष्टकरी, घरकामवाली, वेश्या, भिकारी, अशिक्षित, अत्यल्पशिक्षित इत्यादीं स्त्रियांचा समावेश होतो. त्यांची टक्केवारी खूपच मोठी आहे. त्यांच्या मुक्तीसाठी अजूनही खूप लांब पल्ला गाठायचा आहे. या शोषित स्त्री वर्गाच्या संपूर्ण स्वातंत्र्याबाबत कोणासही आक्षेप असू नये. या वर्गाच्या अंतर्गत रचनेतही शोषण आहेच. जसे की भिकारी आणि वेश्याव्यवसायात स्त्रियाच इतर स्त्रियांचे शोषण करतात. पण हे वास्तव पुरुषी नियंत्रणाखाली असल्याने अंतिमतः ते पुरुषी शोषणच ठरते. सामाजिक विषमतेमुळे हे शोषण अपरिहार्य ठरते. 'दुरितांचे तिमिर जावो' म्हणून ते कधीही जात नसते. ते जाण्यासाठी कदाचित 'सत्ययुग' यावे लागेल. खरा आक्षेपाचा मुद्दा निर्माण होतो तो दुसऱ्या वर्गाबाबत म्हणजेच शोषक स्त्रियांबाबत. हा शोषक वर्ग आर्थिक, शैक्षणिक, वैचारिक मागासलेला नाही. हा समृद्ध वर्ग आहे. या वर्गाचा उदय कसा झाला तर, व्यापक स्त्रीमुक्ती चळवळीचा अनिवार्य असा निष्कर्ष म्हणून या शोषक वर्गा चा उदय झालेला आहे. लोकशाही समाजव्यवस्था आणि इहवादी धोरणाचा एक निष्पादित वर्ग म्हणून पुरुषांपेक्षा वेगळा असे या वर्गाचे स्वरूप आहे.

स्त्रिया जिथे अतिशय प्रगतीपथावर आहेत, ती वानगीदाखल काही क्षेत्रे पाहू. जसे की ज्ञान, सौंदर्य, धर्म. या क्षेत्रात या सुशिक्षित वर्गातील स्त्रियांची आघाडी दिसून येते. पण तर्क आणि नीती

या क्षेत्रात त्या पिछाडीवर असल्याचे आढळते. ज्ञानक्षेत्र म्हणजे शिक्षण. मुक्ता साळवे, रमाबाई रानडे, आनंदीबाई जोशी, सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांच्यामुळे स्त्रीशिक्षणाची ज्ञानगंगा वाहती झाली. शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार झाला. आदिवासी भागात अजूनही शिक्षणाची आबाळ असली तरी शिक्षण महत्वाचे आहे ही जाणीव निर्माण झाली आहे आणि त्यासाठी मागणी देखील पुढे येऊ लागली. प्राथमिक शिक्षण ते उच्च विद्यापीठीय स्तरावर स्त्रियांचा सहभाग आज सहज झाला आहे. स्त्री-शिक्षक आज सर्वत्र दिसतात. शिक्षण क्षेत्रात शिक्षिका ते शिक्षकेतर कार्यालयीन कर्मचारी वर्ग हा उच्च स्त्रीवर्ग आहे.

सौंदर्यशास्त्र या वैचारिक क्षेत्रात मानवी निर्मित कला, ललितकला आणि त्यांचा सौंदर्यानुभव यांचे चिंतन होते. हा सैद्धांतिक पातळीवर खास तत्त्वज्ञानाचा विषय असून त्याचे उत्तम उपयोजन साहित्यशास्त्रात दिसून येते. मानवी सौंदर्याचे चिंतन म्हणून सौंदर्य प्रांतात सौंदर्याची प्रमाणे आणि परिमाणे स्त्रीकेंद्रीच आहेत. अनुषंगिक प्रेमसाहित्यविश्वात प्राचीन काळापासून सौंदर्याचे प्रतीक म्हणून केवळ स्त्रीच केंद्रस्थानी आहे. संगीत, नृत्य, नाट्य, कथा-काव्य-महाकाव्य इत्यादी कलांमध्ये स्त्रीसौंदर्य मूलभूत मानले गेले. आदि पर्वातील काही उदाहरणं बघायची झाल्यास, तिलोत्तमा, द्रौपदी, उर्वशी, मंदोदरी, अहिल्या, दमयंती, रुक्मिणी, सीता, मोहिनी, मंदोदरी ई. विलक्षण सुंदर आणि मोहक स्त्रिया ज्यांच्या मुळे युद्ध झाली,कथांचा मार्ग बदलला यांची दखल घेता येईल.

स्त्री ही सृष्टीची शक्ती मानली जाते, म्हणजेच मानव जातीचे अस्तित्वच स्त्रीपासून आहे असे मानले जाते. महिला सक्षमीकरणाचा अर्थ या निर्मितीच्या शक्तीचा विकास करणे आणि परिष्कृत करणे. स्त्रीला सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय, विचार स्वातंत्र्य, श्रद्धा, धर्म आणि उपासना, संधीची समानता प्रदान करणे आहे. दुसऱ्या शब्दांत महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांची सामाजिक आणि आर्थिक स्थिती सुधारणे. जेणेकरून त्यांना रोजगार, शिक्षण, आर्थिक प्रगतीच्या समान संधी मिळतील, जेणेकरून त्यांना सामाजिक स्वातंत्र्य आणि प्रगती मिळेल. हाच मार्ग आहे ज्याद्वारे स्त्रिया पुरुषांप्रमाणेच त्यांच्या आकांक्षा पूर्ण करू शकतात. सोप्या शब्दात सांगायचे झाल्यास महिला सक्षमीकरणाची व्याख्या अशा प्रकारे केली जाऊ शकते की यामुळे महिलांमध्ये ती शक्ती येते, ज्यातून ती तिच्या जीवनाशी संबंधित प्रत्येक निर्णय स्वतः घेऊ शकते आणि कुटुंब आणि समाजात चांगले आयुष्य जगू शकते. महिला सक्षमीकरण म्हणजे त्यांना समाजात त्यांचे खरे अधिकार मिळवून देणे. मना सोबत शरीर सुद्धा सुदृढ असणे गरजेचे आहे. दररोज व्यायाम करणे, शारीरिक कष्टाची कामे करणे यानी एक वेगळा आत्मविश्वास आणि धाडसी प्रवृत्ती येण्यासाठी मदत होईल. त्यामुळे स्त्री शारीरिक दृष्ट्या परिपूर्ण होईल सक्षम होईल. शिक्षणामुळे बुद्धीचा विकास होईलच पण व्यायामामुळे आणि खेळामुळे तिचा शारीरिक विकास सुद्धा होईल.

महिला सक्षमीकरणाची गरज निर्माण झाली कारण भारतामध्ये लैंगिक असमानता होती आणि प्राचीन काळापासून हा पुरुष प्रधान समाज होता. महिलांना त्यांच्याच कुटुंबाकडून आणि समाजाकडून अनेक कारणांनी दडपण्यात आले आणि कुटुंबात आणि समाजात त्यांच्यावर अनेक प्रकारच्या हिंसाचार आणि भेदभावाला सामोरे जावे लागले, हे केवळ भारतातच नाही तर इतर देशांमध्येही दिसून येते. भारतीय समाजात महिलांना सन्मान देण्यासाठी आई, बहीण, मुलगी, पत्नी या रूपात महिला देवतांची पूजा करण्याची परंपरा आहे, परंतु आज ती केवळ दिखावाच राहिली आहे. गेल्या काही वर्षांत, लैंगिक असमानता आणि महिलांवरील वाईट प्रथा दूर करण्यासाठी सरकारने अनेक संवैधानिक आणि कायदेशीर अधिकार तयार केले आणि लागू केले आहेत. मात्र, एवढा मोठा प्रश्न सोडवण्यासाठी महिलांसह सर्वांच्या सततच्या सहकार्याची गरज आहे.

स्वातंत्र्य, समता, आणि समृद्धीच्या पुरुष प्रधान सत्ते विरुद्ध प्राचीन काळापासून स्त्रियांनी केलेल्या विरोधाला विसाव्या शतकात थोड्या प्रमाणात यश मिळाले. २८ फेब्रुवारी १९०९ रोजी न्यूयॉर्क येथे पहिला 'महिला दिन साजरा' करण्यात आला. त्याच्या पुढच्या वर्षी १९१० च्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेनुसार ८ मार्च हा दिवस 'आंतरराष्ट्रीय महिला दिन' म्हणून साजरा करण्याचे निश्चित करण्यात आले. ही जाणीव होण्यासाठी भारतात ३३ वर्षे गेली. मुंबईत पहिला महिला दिवस ८ मार्च १९४३ रोजी साजरा केला गेला. दरवर्षी महिला दिवस मोठ्या उत्साहात संपूर्ण जगात साजरा करण्यात येतो. पुण्यात मात्र ही जागृती १९४३ नंतर ३२ वर्षांनी आली. पुण्यात ८ मार्च १९७१ रोजी मोठा मोर्चा काढण्यात आला. हि महाराष्ट्रातील स्त्रीवादी चळवळीची सुरुवात होती. महाराष्ट्र शासना तर्फे १९९४ मध्ये पहिले महिला धोरण जाहीर केले गेले. त्यात कालसुसंगत बदल करत २००१ मध्ये दुसरे महिला धोरण तर २०१४ मध्ये तिसरे महिला धोरण निश्चित केले गेले. या सर्व धोरणांमध्ये प्रामुख्याने स्त्रियांवरील अत्याचार, हिंसा, स्त्रीविषयक कायदे, त्यांच्या आर्थिक दर्जात सुधारणा, प्रसारमाध्यमांची भूमिका, स्वंयसेवी संस्थांचा सहभाग, स्त्रियांना केंद्रस्थानी मानून योजनांची निश्चिती, स्वंयसाहाय्यता बचतगटांचा विकास, मुद्रा योजना यांचा प्रामुख्याने विचार केला जातो. शासकीय-निमशासकीय यंत्रणांमध्ये स्त्रियांना नोकरीत ३० टक्के आणि स्थानिक स्वराज्य संस्थात ५० टक्के आरक्षण मिळते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (जिल्हा परिषद/ पंचायत समित्या व ग्रामपंचायती) स्व-उत्पन्नातील १० टक्के निधी स्त्री आणि बालकल्याणासाठी राखून ठेवण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. शासनाने जिल्हा परिषदांनी त्यांच्या स्व-उत्पन्नाच्या १० टक्के निधीतून राबवावयाच्या योजनांची निश्चिती करून दिली आहे. शासनाने या योजना दोन गटांत विभागल्या आहेत. पहिल्या गटात प्रशिक्षण आणि सक्षमीकरणाच्या योजना आहेत तर दुसऱ्या गटात विविध वस्तू खरेदीच्या योजनांचा समावेश आहे.महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून, महाराष्ट्र राज्य

ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून स्त्रियांना शिक्षण-प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होत आहेत. शिक्षण म्हणजे ज्ञान. साक्षात प्रकाशच. लपून राहणे हा प्रकाशाचा धर्म नाही. त्याप्रमाणे शिक्षण घेतलेल्या बायका प्रकाशा सारख्या पसरल्या. ज्या समाजात महिलांचे स्थान उन्नत असते, महिलांचा सन्मान केला जातो असा समाज प्रगतीची शिखरे गाठतो. राज्य शासनाच्या महिला आणि बालविकास विभागामार्फत महिलांच्या सक्षमी करणासाठी, मुलीच्या जन्मा साठी योजना केल्या आहेत. राज्यात बचतगटांची मोठ्या प्रमाणात उभारणी करण्यात आली आहे. बचतगटांना विविध उद्योग-व्यवसायासाठी बँकेमार्फत पतपुरवठा करण्यात येतो. कुटुंब आणि करियर एकाच वेळी व्यवस्थित सांभाळण्याची शक्ती स्त्रियांमध्ये आहे. ग्रामीण किंवा शहरी भागातील महिला आपल्या इच्छाशक्तीच्या जोरावर या कसरतीमध्ये यशस्वी होतात. आजची स्त्री नव्या आणि जुन्या सीमेवर रेंगाळणारी आहे परंतु संभ्रमित नक्कीच नाही. शिक्षणामुळे स्त्री कणखर झाली आहे. स्वतःचे निर्णय स्वतः घेण्याची क्षमता आज स्त्रियांमध्ये आली आहे. सामाजिक बांधिलकी, समाजाविषयी असलेले कर्तव्य याची जाण आजच्या स्त्री ला आहे.

स्त्री सक्षमीकरणाच्या प्रक्रियेतील महत्वाचे मुद्दे म्हणजे लैंगीक आरोग्य, नैसर्गिक साधनसंपत्तीची राखणावळ, आर्थिक सक्षमता, शैक्षणिक सक्षमता, राजकीय सक्षमता,आर्थिक बचतगट, मानसिक सक्षमता ई.

भारतीय समाजामध्ये अनेक प्रकारच्या रूढी, श्रद्धा आणि परंपरांचा समावेश आहे. यापैकी काही जुन्या समजुती आणि परंपरा अशा आहेत की ज्या भारतातील महिला सक्षमीकरणात अडथळा ठरतात. जुन्या विचारसरणीमुळे भारतातील अनेक भागात महिलांना घराबाहेर पडण्यास बंदी आहे. अशा भागात महिलांना शिक्षण किंवा नोकरीसाठी घराबाहेर पडण्याचे स्वातंत्र्य नाही. अशा जुन्या विचारसरणीच्या वातावरणात राहिल्यामुळे, स्त्रिया स्वतःला पुरुषांपेक्षा कमी समजू लागतात आणि त्यांची सध्याची सामाजिक आणि आर्थिक स्थिती बदलण्यात अपयशी ठरतात. कामाच्या ठिकाणी होणारे शोषण हा देखील महिला सक्षमीकरणातील एक मोठा अडथळा आहे. खासगी क्षेत्र जसे की सेवा उद्योग, सॉफ्टवेअर उद्योग, शैक्षणिक संस्था आणि रुग्णालये या समस्येने सर्वाधिक प्रभावित आहेत. समाजातील पुरुषी वर्चस्वामुळे स्त्रियांसाठी समस्या निर्माण होतात. अजूनही कामाच्या ठिकाणी महिलांशी लिंग पातळीवर भेदभाव केला जातो. अनेक भागात महिलांना शिक्षण आणि नोकरीसाठी घराबाहेर पडण्याची परवानगीही नाही. यासोबतच त्यांना स्वतंत्रपणे काम करण्याचे किंवा कुटुंबाशी संबंधित निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नसते आणि प्रत्येक कामात त्यांना नेहमीच पुरुषांपेक्षा कमी समजले जाते.

महिलांना कायदेशीर अधिकारांसह सक्षम करण्यासाठी काही कायदे पारित केलेले आहेत. उदा. अनैतिक वाहतूक (प्रतिबंध) कायदा १९५६, हुंडा बंदी कायदा १९६१, समान

मोबदला कायदा १९७६, मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नेंसी कायदा १९८७, लिंग चाचणी तंत्र कायदा १९९४, बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६, कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ कायदा २०१३ ई. कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा, कामाच्या ठिकाणी CCTV बसविणे, विजेची उपलब्धता ई. सकारात्मक बाबींमुळे कामाच्या ठिकाणी स्त्रियांसाठी सुरक्षित वातावरण तयार होणेसाठी मदत झाली आहे. कौटुंबिक हिंसाचार कायदा २००५ अमलात आल्यापासून घरगुती हिंसाचार बळी कमी झाले आहेत. तसेच तिहेरी तलाक या अमानवीय परंपरेला आता अमान्य ठरविण्यात आले आहे.

बदलत्या काळानुसार आधुनिक युगातील स्त्रिया लिहिण्या-वाचण्याला मोकळ्या झाल्या आहेत. त्यांना स्वतःच्या अधिकारांची जाणीव आहे आणि स्त्रिया स्वतःचे निर्णय स्वतः घेत आहेत. स्त्री हि आता घरातील उंबरठा ओलांडून देशासाठी विशेष महत्त्वाचे काम करते. आपल्या देशातील लोकसंख्येपैकी जवळपास निम्मी महिला आहेत. या कारणास्तव, राष्ट्राच्या विकासाच्या महान कार्यात महिलांची भूमिका आणि योगदान पूर्णपणे आणि योग्य दृष्टीकोनातून ठेवूनच राष्ट्र उभारणीचे ध्येय साध्य करता येऊ शकते. भारतात अशा स्त्रियांची कमी नाही, ज्यांनी समाजातील बदलाची आणि स्त्री सन्मानाची आंतरिक भीती आपल्यावर हावी होऊ दिली नाही. आपल्या देशात अशी अनेक उदाहरणे आहेत जी महिला सक्षमीकरणाचा समानार्थी बनत आहेत. जसे कि तिहेरी तलाकविरोधात आवाज उठवणाऱ्या अतिया साबरी, ॲसिड पीडितांच्या न्यायासाठी लढणाऱ्या वर्षा जवळगेकर, अनेक अनाथांची माय झालेल्या सिंधुताई सपकाळ अशी एक ना अनेक उदाहरणे आहेत. आज देशात सर्वच अंगांनी स्त्री शक्तीचे सक्षमीकरण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. याचा सकारात्मक परिणामही दिसून येत आहे. आज देशातील महिला जागरूक झाल्या आहेत. आजची स्त्री घर आणि संसाराची जबाबदारी अधिक चांगल्या पद्धतीने पेलू शकते हा विचार बदलला आहे. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या आजच्या स्त्रिया सर्वात मोठ्या कार्यक्षेत्रात आपले महत्त्वाचे योगदान देत आहेत. मजुरीचे काम असो की अंतराळवर जाणे. महिला प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करत आहेत. महिला सक्षमीकरणाशिवाय स्त्रीला देश आणि समाजात नेहमीच तिचे स्थान मिळू शकत नाही. महिला सक्षमीकरणाशिवाय ती जुन्या परंपरा आणि वाईट गोष्टींना तोंड देऊ शकत नाही. बंधनातून मुक्त झाल्याशिवाय स्त्री स्वतःचे निर्णय घेऊ शकत नाही. महिला सक्षमीकरणाअभावी स्त्रीला वैयक्तिक स्वातंत्र्य आणि तिच्या निर्णयांवर अधिकार मिळू शकत नाहीत.

महिला सक्षमीकरणामुळे महिलांच्या जीवनात अनेक महत्वाचे बदल झाले आहेत. स्त्रिया प्रत्येक कामात सक्रिय सहभाग घेऊ लागल्या आहेत. स्त्रिया त्यांच्या जीवनाशी संबंधित निर्णय स्वतः घेत आहेत. स्त्रिया त्यांच्या हक्कांसाठी लढू लागल्या आहेत आणि हळूहळू स्वावलंबी होत आहेत. पुरुषही आता महिलांना समजून घेत आहेत, त्यांना त्यांचे हक्क देत आहेत. पुरुष

आता स्त्रियांच्या निर्णयाचा आदर करू लागले आहेत. महिलांनी त्यांच्या कर्तृत्वाने आणि संघटितपणे पुरुषांकडून त्यांचे हक्क मिळवले आहेत.

एक प्राध्यापक महाषयांची पत्नी एक उत्तम गृहिणी आहे. कुठल्याही कार्यक्रमात, चारचौघात स्वतःच्या पत्नीची ते ही तर घरीच असते आणि विशेष काही करत नाही इतकीच ओळख करून द्यायचे. त्यांचा 12 वर्षांचा मुलगा नेहमी हे ऐकत असायचा. एकदा त्याने शाळेत मुलांच्या दृष्टीकोनातून आई या विषयावर निबंध लिहिला. त्यासोबत त्याने त्याची आई जि गृहिणी आहे आणि शेजारील गृहिणी या कुठलाही मोबदला न घेता दिवसभरात किती आणि काय काम रोज करत असतात हे सचित्र दाखवले. जे बघून त्या प्राध्यापक महाशयांचे व त्यांच्यासारख्या अनेकांचे डोळे उघडले. एक गृहिणी किती पातळींवर किती गोष्टी सांभाळत असते हे त्यांना कळले. सुलभ संदर्भासाठी "Google" चा आधार घेऊन सदर फोटो इथे उपलब्ध करून देत आहे.



फोटो सौजन्य – Google

महिलांना हक्क आणि समानतेची संधी मिळण्यासाठी केवळ महिला सक्षमीकरणच महत्त्वाची भूमिका बजावू शकते. कारण महिला सक्षमीकरण महिलांना केवळ उदरनिर्वाहासाठीच तयार

करत नाही, तर स्त्री चेतना जागृत करून सामाजिक अत्याचारांपासून मुक्ती मिळवण्यासाठीही तयार करते.

भारत हा जगातील सर्वात वेगाने विकसित होणारा देश बनला आहे. त्यादृष्टीने नजीकच्या भविष्यात भारतानेही महिला सक्षमीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यावर भर देण्याची गरज आहे. भारतीय समाजात खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरण घडवून आणण्यासाठी, समाजातील पुरुषसत्ताक आणि पुरुषाभिमुख व्यवस्था असलेल्या महिलांवरील वाईट प्रथांची मुख्य कारणे समजून घेऊन ती दूर केली पाहिजेत. महिलांबद्दलची आपली जुनी विचारसरणी बदलून घटनात्मक आणि कायदेशीर तरतुदींमध्ये बदल करणे अत्यंत आवश्यक आहे. आजच्या समाजात अनेक भारतीय महिला राष्ट्रपती, पंतप्रधान, प्रशासकीय अधिकारी, डॉक्टर, वकील इत्यादी झाल्या आहेत, पण तरीही आजही अनेक महिलांना सहकार्य आणि मदतीची गरज आहे. त्यांना अजूनही शिक्षण, आणि मुक्तपणे काम करण्यासाठी, सुरक्षित प्रवास, सुरक्षित काम आणि सामाजिक स्वातंत्र्यासाठी अधिक समर्थनाची गरज आहे. महिला सक्षमीकरणाचे हे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे कारण देशाची सामाजिक-आर्थिक प्रगती ही महिलांच्या सामाजिक-आर्थिक प्रगतीवर अवलंबून आहे.

महिला सक्षमीकरण महिलांना त्यांच्या हक्कांसाठी लढण्यास बळ देते. महिलांचा आदर केला पाहिजे, त्यांना प्रगतीची संधी दिली पाहिजे. एकविसावे शतक हे स्त्रीच्या जीवनातील आनंदी शक्यतांचे शतक आहे. महिला आता प्रत्येक क्षेत्रात पुढे येत आहेत. आजची स्त्री आता जागृत आणि सक्रिय झाली आहे. कुणीतरी खूप छान म्हंटले आहे की, "**जेव्हा एखादी स्त्री तिच्यावर लादलेल्या बेड्या आणि बंधनं तोडायला लागते, तेव्हा जगातील कोणतीही शक्ती तिला रोखू शकत नाही.**"

जेव्हा स्त्री बाल्यावस्थेत असते तेव्हा पासूनच तिच्या वर महिला सशक्तिकरण करणे गरजेचे आहे. प्रत्येक स्त्रीला ती स्वतंत्र असल्याची जाणीव करून देऊन तिला शिक्षणाचा हक्क जोपासण्याची प्रवृत्त केले पाहिजे.

आजची स्त्री फक्त चूल आणि मूल सांभाळण्या पुरती राहिली नाही. तर औद्योगिक, शिक्षण आणि तंत्रज्ञान या तिन्ही क्षेत्रात स्त्रीयांचा सहभाग बघायला मिळत आहे. बदलत्या परिस्थितीत स्त्रीची भूमिका सुद्धा बदलत जात आहे. ती आज कोणाच्या घरची मुलगी, सून, पत्नी व आई या सर्व नात्यांबरोबरच स्वतःच करियर देखील उत्तम सांभाळते. स्त्रीयांचा विकास तर झालाच आहे, परंतु त्या विकासाला सर्वांगीण विकास असे म्हणू शकत नाही, कारण समाजाचा काही भाग खूप पुढे गेला प्रगत झाला पण याच समाजाची काही भाग अजूनही मागे राहिलेला आहे. प्रत्येक स्त्री आर्थिक, सामाजिक आणि मानसिक दृष्ट्या सुरक्षित आणि स्वतंत्र असली पाहिजे.

भारतीय महिला ही कधी अबला नव्हतीच. नवदुर्गेची पूजा करणाऱ्या संस्कृतीतील भारत हा स्त्रीशक्तीचा आदर करणारा देश आहे. असे म्हणतात कि प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एका स्त्रीचा सहभाग असतो. भारतामध्ये घडलेले अनेक महापुरुष स्त्रीमुळे घडले. राजमाता जिजाऊ, राणी लक्ष्मीबाई, अहिल्यादेवी होळकर, सावित्रीबाई फुले, रमाबाई आंबेडकर, मदर टेरेसा, सरोजिनी नायडू, इंदिरा गांधी, कल्पना चावला, सुनीता विल्यम्स, पी. टी. उषा आणि इतरही अनेक कर्तृत्ववान महिलांनी या देशाचा नावलौकिक वाढविला आहे. राजमाता जिजाऊ होत्या म्हणून संस्कारमूर्ती व किर्तीवंत असे छत्रपती शिवराय घडले. सावित्रीबाई फुलेंची साथ होती म्हणूनच जोतिबा फुले हे महात्मा झाले आणि इतकेच नव्हे, तर कौसल्यानंदन श्रीराम व अंजनीपुत्र हनुमान ही आपली देवप्रतीके स्त्रीच्या संस्काराचा आणि सृजनाचा आविष्कार आहे. महिलांमध्ये निसर्गाकडून काही देणग्या पुरुषांपेक्षा जास्त आहेत. स्त्रीमध्ये सहनशीलता, नावीन्यता, सौंदर्याची जाणीव, बचत वृत्ती, संघप्रेरणा, स्मरणशक्ती हे गुण निसर्गतःच पुरुषांपेक्षा अधिक आहेत. स्त्री हि सृजनशील आहे; कारण निसर्गाने निर्मितीचा अधिकार स्त्रियांना दिला आहे, स्त्री मुळातच सबला आहे.

जरी संविधानाने स्त्री व पुरुष यांना समान अधिकार दिले असले तरी आजच्या परिस्थितीमध्ये भारताच्या पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्री हि समाज व कुटुंबाच्या बंधनात अडकून पडली आहे. तीन 'प' अर्थात पिता, पती आणि पुत्र यांच्या आदेशाने आणि बंधनाने ती आपले आयुष्य काढते आहे. अगदी कामकाजी, व्यवसायी, नोकरदार महिलांशी चर्चा केली असता त्यादेखील स्वतःला सक्षम मानत नाहीत. त्यांच्या दृष्टीने महिला सबलीकरण म्हणजे फक्त कार्यक्रम, व्याख्यान आहे; पण तसे न होता वास्तविकतेत महिलांना त्यांच्या क्षमतांची जाणीव करून वैयक्तिक स्वातंत्र्य व निर्णय घेण्याचा अधिकार मिळणे होय. खरं सांगायचं तर पुरुषांबरोबरच स्त्रियांना स्त्रीयांशीच लढा द्यावा लागतो. पूर्वी स्त्रियांचे आयुष्य चूल आणि मूल इतकेच मर्यादित होते. त्यामुळे सून आली कि सासू फक्तं बसून राहत असे. घरातील वर्चस्वासाठी सासू सुनांचे हेवेदावे असत. कालांतराने स्त्री शिक्षणासाठी बाहेर पडली. नंतर नोकरी, करियर या गोष्टींसाठी बाहेर पडली. माझ्या ओळखीतील किती तरी स्त्रिया, मुली लग्न झालेल्या आणि न झालेल्या देखील नोकरीच्या निमित्ताने बाहेरच्या देशात एकट्या काम करत आहेत. कुटुंबाची साथ असेल तर हे सहज शक्य आहे. परंतु आजही जुन्या विचारसरणीचे काही लोकं आहेत ज्यांना स्त्रियांनी फक्तं घर, स्वयंपाक हि कामं करावीत. तसेच जर एखादीला असेलच नोकरी, करियर ची हौस तर घर सांभाळून हि हौस पुरवावी. नोकरी करून हि उत्तम स्वयंपाक, स्वच्छ घर, सगळ्यांच्या हातात सगळं पुरवलं तरच ती एक चांगली पत्नी, एक चांगली सून ठरते, अन्यथा नाही. आजही स्त्री शिक्षित झाली, स्वावलंबी झाली पण तिची परीक्षा ती किती गोल पोळी करते यावरच होते. घरात असणाऱ्या आई, सासु यांनी जर तिला खंबीर

पाठींबा दिला तर ती अजून मुक्त भराऱ्या घेऊ शकते. स्त्री शक्तीच्या रूपात देशात असलेले मनुष्यबळ जर विकसित झाले आणि स्त्रीशक्तीचे आरोग्य, शिक्षण, संस्कार व स्वालंबन हे चार आधारस्तंभ भक्कम करायला सर्वांनी पुढाकार घेतला तर समाजात सुराज्य व स्वराज्य दिसेल आणि फक्त अभियानापुरते किंवा फक्तं कागदोपत्री नाही, तर वास्तवात महिला सबलीकरण झालेले असेल.

डॉक्टर, इंजिनिअर, वकील, सीए किंवा आकाशाला गवसणी घालणाऱ्या वैमानिक वा संपूर्ण जगाला बोटीवरून प्रदक्षिणा घालणाऱ्या साहसी समुद्र तारिणी, राजकीय नेत्या, सनदी अधिकारी, कार्पोरेट विश्वातील बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या सीईओ, आंतरराष्ट्रीय खेळांमध्ये पदके मिळवून देत देशाचे नाव उंचावणाऱ्या खेळाडू, मोठ्या प्रमाणावर कार्यरत प्रशासक महिला, सैन्यदलात कर्तव्य बजावणाऱ्या वा स्वयंसेवी संस्थांमार्फत सामाजिक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्या, क्षेत्र कुठलेही असो, प्रत्येक ठिकाणी महिला सक्षमपणे आणि यशस्वीरीत्या आपली भूमिका पार पाडत आहेत. आज सर्वच क्षेत्रांत स्त्रिया अग्रेसर आहेत. सक्रिय आहेत, यशस्वी आहेत. म्हणजेच त्यांच्यात नेतृत्वगुणांची, कौशल्याची, ज्ञानाची कमतरता नाही. परंतु, अशा उच्चपदासीन महिलांचे प्रमाण फारच कमी आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये अगदी पूर्वीच्या काळापासून पाहिलं तर महिला या कधी वेगळ्या गणल्या गेल्या नाहीतच. याचा अर्थ त्यांना काही स्थान नव्हते त्यांना काही किंमत नव्हती असा कोणी काढला तर ते काही फारसे चूक नाही पण ते सत्य मात्र मुळीच नाही .कधीकाळी अगदी स्मृती काळात किंवा स्मृतीपूर्वकाळात सुद्धा 'यत्र नार्यस्तु पूजन ते रमंते तत्र देवता' हे विधान त्या काळात स्त्रीला किती महत्त्व होते हे दर्शवते. ज्या घरात स्त्रीचा आदर होतो सत्कार होतो तिथे देवतांचा वास असतो असंच वरील सुभाषित सांगतं. दुर कशाला रामायण काळात दशरथास राणी कैकयी यांनी युद्धात मदत केल्याचे दाखले आहेत. इतकच कशाला शंकराचार्य काश्मिरात धर्मप्रचाराच्या कार्यासाठी गेले त्यावेळी त्यांचा सुप्रसिद्ध द्वैतवादी विद्वान मंडन मिश्र यांच्याबरोबर वादविवाद पार पडला. या वादविवादाच्या न्यायाधीश कोण होता आश्चर्य वाटेल, त्या मंडन मिश्र यांच्या सुविद्य पत्नी लीलावती या होत्या. ही सगळी उदाहरण जी वाचायला मिळतात ती तत्कालीन समाजात स्त्रीचं स्थान किती उच्च आणि महत्त्वाचं होतं हे दर्शवणारीच आहेत. अर्थात त्या काळी असलेल्या एकत्र कुटुंब पद्धतीत आणि समाज रचनेत घरातील व्यवसायाची काम पुरुषांनी करावीत आणि स्त्रियांनी घरातील सर्व काम करावीत विशेषतः साऱ्या घराच्या आणि समाजाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असे काम म्हणजे मुलांचे संस्कार आणि संगोपन ही जबाबदारी महिलांच्या कडे सोपवलेली होती. विशेष म्हणजे यात कुठलेही दुय्यम किंवा कमी दर्जा लेखण्याचे कारण नव्हते तर ती श्रमविभागणी होती. युद्धावर मदत करणारी रणरागिनी असलेली स्त्री ही घरात पुरुषासाठी ही स्त्री सखी भार्या या विविध रूपात पुरुषाची शक्ती

म्हणूनच उभी होती. दुर्दैवाने कालोघात विशेषतः भारतावर झालेल्या परकीय आक्रमणानंतर भारतीय संस्कृती, संस्कार यात बदल होत गेले. विशेषतः मुस्लिम आक्रमकांनी स्त्रीला केवळ पुरुष मनोरंजनाचे साधन ठरवल्यामुळे परंपरागत शांत संयमी भारतीय समाजाला स्त्रीला घरात ठेवणे भागच होते. कारण शत्रूच्या स्त्रिया पळवणे हे मोठे धार्मिक कार्य असल्याचे परकीय आक्रमक मानत होते. यातून घरात कोंडलेली स्त्री ही पुरुषी वृत्तीचा शिकार होत गेली घरातच राहिल्यामुळे कधीकाळी पतीच्या बरोबरीने पतीच्या व्यवसाय उद्योगात स्थान असलेली स्त्री ही आपोआपच दुय्यम ठरत गेली. घराबाहेर पडायचे नाही,घरातच राहायचे या कारणामुळे शिक्षणापासून वंचित राहिली परिणामी जी स्त्री सर्वच क्षेत्रात सर्व तऱ्हेने कुटुंबात समानतेचे बरोबरीचे स्थान असलेली असायची त्या स्त्रीला घरात समाजात दुय्यम स्थान मिळाले. नंतर म्हणजे मुस्लिमा नंतर आलेल्या इंग्रजी अमलात पश्चिम बंगाल मधून स्त्री उत्थानासाठी चळवळ सुरू झाली. या चळवळीचे फळ म्हणजे इंग्रजी काळात सती प्रथे सारख्या वाईट प्रथेला मूठ माती देणारा कायदाच पारित झाला, तर आपल्या महाराष्ट्रात स्वामी दयानंद सरस्वती यांनी सुरू केलेल्या आर्य समाज सारख्या चळवळी या चळवळींना राजर्षी शाहू महाराजांसारख्यांनी दिलेला पाठिंबा, त्यांच्याच प्रेरणेतून निर्माण झालेल्या समतावादी चळवळी या चळवळींना पूरक ठरेल असे लिखाण करणारे लेखक रा.ज.देशमुख म्हणजे लोकहितवादी महर्षी स्वामी दयानंद आणि त्यांच्या विचाराने प्रभावित झालेले ज्योतिबा फुले, र. धों. कर्वे, धोंडो केशव कर्वे यांनी स्त्री उत्थानासाठी कंबर कसून प्रयत्न सुरू केले. घरात कोंडलेली स्त्री ही शाळा महाविद्यालयात आली. शिक्षणात,उद्योगात तिने आपली पात्रता सिद्ध केली किंबहुना बँकिंग, वैद्यकीय शिक्षण अशा अनेक क्षेत्रात महिला या पुरुष वर्गापेक्षाही श्रेष्ठ किंवा अधिक योग्य ठरल्या आहेत. म्हणून आज युनो सारख्या जागतिक दर्जाच्या संस्थेत, नासासारख्या अवकाश विषय संशोधन करणाऱ्या संस्थेमध्ये, औषध निर्माण करणाऱ्या अनेक कंपन्यात, कंपन्यातील संशोधन विभागात, संगणक, अभियांत्रिकी, सर्वच क्षेत्रात महिला आपली गुणवत्ता श्रेष्ठ असल्याचे सिद्ध करीत आहेत. इतकेच नव्हे तर राजनीतीमध्ये सर्वात उच्च असलेले स्थान म्हणजे पंतप्रधान आणि राष्ट्रपती हे दोन्ही स्थान इंदिरा गांधी यांनी पंतप्रधान म्हणून तर प्रतिभा ताई पाटील, द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रपती म्हणून भूषवली आहेत. न्युझीलंड च्या ४० व्या पंतप्रधान आर्डर्नला (Ardern) यांनी COVID-१९ ची आपत्कालिक परिस्थिती तसेच क्राईस्टचर्च मशिदीवरील गोळीबार प्रकरण ज्या धैर्याने हाताळली त्याबद्दल फॉर्चुन मासिकाने आर्डर्नला जगातील ५० अव्वल नेत्यांमध्ये स्थान दिले आहे. मार्गारेट थॅचर या युरोपच्या पहिला महिला पंतप्रधान होत्या आणि ब्रिटनमध्ये सर्वाधिक काळ पंतप्रधानपदी कार्यरत होत्या. २० व्या शतकात सलग तीन वेळा विजय मिळवणाऱ्या त्या एकमेव ब्रिटिश पंतप्रधान होत्या. सिरिमावो भंडारनायके या १९६० मध्ये श्रीलंकेच्या (तेव्हाचे डोमिनियन ऑफ सिलोन) पहिल्या महिला पंतप्रधान झाल्या.

त्या जगातील पहिल्या महिला पंतप्रधान होत्या. त्यांनी १९६० ते १९९४ पर्यंत श्रीलंका फ्रीडम पार्टीचे अध्यक्षपद भूषवले आणि तीन वेळा पंतप्रधान म्हणून काम केले. गोल्डा मीर या इस्त्रायली राजकारणी आणि शिक्षिका. ज्यांनी १९६९ ते १९७४ पर्यंत इस्त्रायलच्या चौथ्या पंतप्रधान म्हणून काम केले. त्या इस्त्रायलच्या पहिल्या आणि एकमेव महिला प्रमुख होत्या. राज्याच्या,मध्य पूर्वेतील पहिल्या महिला राज्यप्रमुख आणि जगातील चौथ्या निवडून आलेल्या महिला राज्यप्रमुख होत्या. मीर यांनी कामगार मंत्री आणि परराष्ट्र मंत्री म्हणूनही काम केले. इस्त्रायली राजकारणातील 'आयर्न लेडी' म्हणून त्यांचे वर्णन केले जाते.

हि सगळी उदाहरणं बघितली तरी अजून हे प्रमाण वाढणे व महिला ही शक्ती सुदृढ व सक्षम बनविणे या देशाचे ही समाजाची जबाबदारी आहे. एवढ्या मोठ्या वर्क फोर्सला निष्क्रिय ठेवण्याने आपल्या राष्ट्राचे अपरिमित नुकसान होईल.

आदि काळात देवाला सुद्धा काही दैत्य हे पराजित करणे अशक्य होतं त्यावेळी आदिशक्ती देवीने हाती शस्त्र घेऊन दानवाचा दुष्ट शक्तीचा नि:पात केला. परंतु, सैन्यामध्ये जे पुरुषी वर्चस्व असलेले क्षेत्र आहे त्यात बरोबरीचे स्थान मिळवण्यासाठी आजच्या स्त्रियांना मात्र न्यायालयीन लढा द्यावा लागला. न्यायालयानेही या लढ्यात सक्षमीकरणच्या दृष्टीने म्हणून किंवा माणुसकीच्या ,कायद्याच्या, घटनेच्या दृष्टीने या लढ्यात साथ दिली. परिणामी आता पुरुषांच्या बरोबरीने महिला सीमेवर रक्षणासाठी उभ्या आहेत.

राष्ट्रीय विकासात, बुद्धिमत्ता,कठोर ध्येयनिष्ठा, यासोबतच कोमल मानवी भावना ज्या मातृशक्तीकडे आहेत या सगळ्यांची जन्मजात सोबत असलेल्या महिलांकडे नेतृत्व असेल, तर नक्कीच देश परम वैभवाकडे वाटचाल करील याची खात्रीच आहे।

**"कोमल है कमजोर नही तु, शक्ती का नाम हि तेरा नारी है"**

**मिनल**